सार्वजनिक आरोग्य विभागातील सर्व संस्थामधील कार्यरत अधिकारी/ कर्मचाऱ्यांच्या (गट-ब, गट-क व गट-ड) बदल्यांचे धोरण शुध्दीपत्रक.

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन शुद्धिपत्रक क्रमांकः बदली-२०२६/प्र.क्र.१०३/क्षमता बांधणी ई क्र. १६२१८७२
१० वा मजला , गोकुलदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई - ४०० ००१
दिनांक: १० ऑगस्ट, २०२६.

वाचा -

१) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलबांस प्रतिबंध अधिनियम, २००५
२) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक, क्रमांक : एसआरव्ही-२०१४/मुस-३४/ प्र.क्र.३७९/१२, दिनांक ११ फेब्रुवारी, २०१५
३) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक : एसआरव्ही-२०१७/प्र.क्र.४१५/ कार्यासन १२, दिनांक ०९ एप्रिल, २०१८
४) सार्वजनिक आरोग्य विभाग अधिसूचना, दिनांक ०४ फेब्रुवारी, २०२१
५) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन आदेश क्रमांक : बदली-२०२०/प्र.क्र.३७९/सेवा-५, दिनांक २५ मार्च, २०२१
६) शासन निर्णय क्रमांकः बदली-२०२६/प्र.क्र.१०३/प्रा.आ.से., दिनांक १५ एप्रिल, २०२६
७) शासन निर्णय क्र. बदली-२०२६/प्र.क्र. १०३/प्रा.आ.से. दि. १३ मे, २०२६.

**प्रस्तावना :**

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त असणाऱ्या सर्व आरोग्य संस्था व कार्यालयांमध्ये कार्यरत असणाऱ्या गट-ब, गट-क व गट-ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांकरिता सर्वसमावेशक बदल्यांचे धोरण, कार्यपद्धती व निकष उक्त संदर्भ क्रमांक ६ येथील दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निश्चित करण्यात आलेले आहेत.

सदर शासन निर्णयाची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होण्याच्या दृष्टीने सदर शासननिर्णयामध्ये काही अनुषंगिक तरतुदींची भर घालणे व काही तरतुदींमध्ये सुधारणा करणे आवश्यक असल्याची बाब आयुक्त, आरोग्य सेवा यांच्याकडून निदर्शनास आणून देण्यात आली. त्यानुसार दिनांक १५ एप्रिल, २०२६ रोजीच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. तथापि, सदर मूळ शासन निर्णयातील काही बाबी वगळून सुधारित शासन शुद्धिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे शुध्दीपत्रक निर्गमीत करण्यात येत आहे.

शासन शुद्धिपत्रक :-

**बदलीचा प्रकार व बदल्यांची टक्केवारी खालीलप्रमाणे राहील-**

उक्त शासन निर्णयाच्या परिच्छेद १ (ड) मध्ये प्रत्येक कॅलेंडर वर्षात विनंती बदल्यांचे माहे सप्टेंबर व माहे डिसेंबर महिन्यात निर्गमित होतील याप्रमाणे विनंती बदल्यांसाठी केवळ दोनदाच प्रस्ताव विचारात घेतले जातील ही अट वगळण्यात येत असून पुढील प्रमाणे नवीन तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे.

"प्रत्येक कॅलेंडर वर्षात गट-क व गट-ड संवर्गातील कर्मचाऱ्यांचे विनंती बदल्यांचे प्रस्ताव प्राप्त होतील त्याप्रमाणे नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल."

२. उक्त शासन निर्णय दि. १५.०४.२०२६ व शासन शुध्दीपत्रक दि.१३.०५.२०२६ मधील शासन निर्णयातील तसेच शुध्दीपत्रकातीलनमूद बाबी वगळता उर्वरित सर्व तरतुदी कायम राहतील.

सदर शासन शुद्धिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०८१०१२५१२४८२१७ असा आहे. सदर शासन शुद्धिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

ARVIND BHIMRAO MORE

Digitally signed by ARVIND BHIMRAO MORE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Public Health Department, 2.5.4.20=203AF2DFBA7DB2A4824298A34F2C9294F93396F53D7F87CD4D69FECF5CF7005F, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=9246B8CCD2E2CB10707678D45EA1AD26CC1E4D7BFF7BD2AA1F253A716B8C448B, cn=ARVIND BHIMRAO MORE
Date: 2026.08.10 13:03:13 +05'30'

**(अ.भि.मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. महालेखापाल-१/२ (लेखा परीक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
४. संचालक-१/२, आरोग्य सेवा आयुक्तालय, मुंबई/पुणे.
५. सह संचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई.
६. सहसंचालक, आरोग्य सेवा (हिवताप, हत्तीरोग व जलजन्यरोग), पुणे
७. उप संचालक, आरोग्य सेवा,सर्व परिमंडळे.
८. जिल्हा शल्य चिकित्सक,(सर्व)
९. जिल्हा आरोग्य अधिकारी, (सर्व)
१०. निवडनस्ती - प्रा.आ.से.